**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.रंजना अशोक नलावडे
मुख्याध्यापिका, गर्ल्स हायस्कूल,राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
मुख्याध्यापिका, गर्ल्स हायस्कूल,राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८७/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.१२.२००८ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** सौ.रंजना अशोक नलावडे<br>मुख्याध्यापिका, गर्ल्स हायस्कूल,राधानगरी,<br>ता.राधानगरी, जि.कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी,<br>माध्यमिक शिक्षण विभाग,<br>जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.शरद गोसावी<br><br>**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**<br>मुख्याध्यापिका, गर्ल्स हायस्कूल,राधानगरी,<br>ता.राधानगरी, जि.कोल्हापूर सौ.रंजना अशोक नलावडे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०२.०९.२००५ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.०९.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.११.२००५ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

संस्थेच्या संदर्भात धर्मादाय आयुक्तांपुढे प्रकरण प्रलंबित असून स्वतःला सचिव म्हणून घेणारे श्री.सुनिल दत्तात्रय बडदारे यांनी सन १९८७ पासूनची माहिती मागिती होती. ती देता येत नसल्याचे त्यांना कळविले होते हीच माहिती श्री.बडदारे यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्याकडे मागितली व आपण माहिती न दिल्याबद्दलचे अपीलही शिक्षणाधिकाऱ्यांकडे, तसेच सहाय्यक आयुक्त (मागसवर्ग कक्ष), पुणे विभाग, पुणे यांच्याकडेही केले. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२ हा कायदा निरस्त झाला असताना या कायद्याखालील अर्ज व अपील असून त्याबाबत वेळोवेळी आपण सर्व संबंधित अधिकाऱ्यांना उत्तरे दिली आहेत. आपले म्हणणे ऐकून न घेता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद कोल्हापूर. यांनी दंड केला. तो रद्द व्हावा, अशी मागणी अपीलकर्त्या सौ. रंजना अशोक नलावडे यांनी केली.

माहिती वेळेवर न मिळाल्यामुळे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर, श्री.शा.द.भोई यांनी श्रीमती नलवडे यांना रु.२,०००/- दंड केला व सात दिवसांत माहिती देण्याचे आदेश दिले, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर, यांचे प्रतिनिधी श्री.के.वाय.भोईटे यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदन व कागदपत्रे पहाता मूळ अर्जदाराने निरस्त झालेल्या महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२ अन्वये अर्ज केला आहे, व अपिलांबाबतही योग्य प्रक्रिया पार पाडलेली नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनयम,२००५ आता अंमलात असून त्यानुसार दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांना नाहीत. शिवाय त्यांनी सौ.नलावडे यांना बाजू मांडण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक होते.

वरील बाबी लक्षात घेता तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.शा.द.भोई यांनी केलेली दंडात्मक कार्यवाही नियमबाह्य व म्हणून रद्द करण्यास पात्र ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य.

२. मूळ प्रकरणात अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर,जि.कोल्हापूर श्री.शा.द.भोई यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गर्ल्स हायस्कूल, राधानगरी, ता.राधानगरी,जि.कोल्हापूर सौ.रंजना अशोक नलावडे यांच्यावर केलेली दंडात्मक कार्यवाही नियमबाह्य असून रद्द ठरविण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०/१२/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विनायक दशरथ मस्के
नांदगाव, पो.गोटेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, मोहोळ,
पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत नांदगाव, पो.गोटेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विनायक दशरथ मस्के
नांदगाव, पो.गोटेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, मोहोळ,
पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.प्रशांतसिंह मरोड

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत नांदगाव, पो.गोटेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.महादेव सावता शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि१८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मौजे नांदगाव, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील तीन ठिकाणच्या सार्वजनिक शौचालयाचे बांधकामाचे दगड अन्यत्र वापरले असून त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, नांदगाव, पो.गोटेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांनी सन २००२ ते २००४ या कालावधीत तत्कालीन ग्रामविकास अधिकारी असलेले श्री.के.आय.सय्यद यांच्याकडून त्याबाबतचा खुलासा मागविला व बांधकाम केलेले नाही, असे श्री.सैय्यद यांनी कळविले. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, नांदगाव, पो.गोटेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.महादेव सावता शिंदे यांनीही तसेच उत्तर दिले. प्रत्यक्षात सन १९९२ ते १९९५ या काळात शौचालयाचे बांधकाम केले होते. त्यांचे साहित्य अन्यत्र वापरून अर्धवट पडलेले बांधकाम अजूनही अस्तित्वात आहे, असे आपण अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांच्या निदर्शनास आणून दिले. सार्वजनिक पैशाच्या अपहाराचे हे प्रकरण आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विनायक दशरथ मस्के यांनी केले.

तत्कालीन ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या काळातील हा विषय असून बांधकाम झाले नसल्याचे व त्यामुळे कागदोपत्री तशी नोंद नसल्याचे त्यांनी कळविले, तशी माहिती आपण दिली, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, नांदगाव, पो.गोटेवाडी, ता.मोहोळ,

जि.सोलापूर श्री.महादेव सावता शिंदे यांनी सागितले. सन १९९२ मध्ये कामे झालेली असून त्याचे दगड दुसऱ्या बांधकामाला वापरलेले आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.प्रशांतसिंह मरोड यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने लक्षात घेता देण्यात आलेली माहिती व वस्तुस्थिती यात विसंगती असल्याचे दिसते. शासकीय-अनुदानाच्या म्हणजेच सार्वजनिक निधीच्या विनियोगाचा हा प्रश्न आहे. त्यामुळे या संदर्भात वस्तुस्थितीची नेमकी माहिती अपीलकर्त्याला व पर्यायाने नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांनी याबाबत चौकशी करून १५ दिवसात आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार अहवाल सादर करण्यात आलेला नाही, ही बाब गंभीर आहे.

वस्तुस्थितीची चौकशी करून, बांधकाम झाले होते की नाही, बांधकाम झाले असल्यास त्याचे साहित्य अन्यत्र वापरण्यात आले काय व असल्यास त्याची नोंद ग्रामपंचायतीच्या दप्तरी आहे काय, याबाबतची चौकशी तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.प्रशांतसिंह मरोड यांनी करणे आवश्यक होते. त्यानुसार त्यांनी कार्यवाही केलेली नाही, हा आयोगाच्या आदेशाचा व पर्यायाने शिस्तीचा भंग आहे, म्हणून ते कारवाईस पात्र ठरतात.

आयोगाने स्मरण दिल्यानंतर विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्रीमती मनीषा देसाई यांनी 'दि.२४.९.२००९ च्या पत्रान्वये विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, मोहोळ यांनी संबंधित बांधकामाची दगड व माती जवाहर रोजगार योजनेअंतर्गत बांधलेल्या ओट्यास वापरली आहे, त्याची नोंद ग्रामपंचायत रजिस्टरला आहे काय? याबाबत दोन दिवसांत समक्ष तपास करून अहवाल सादर करावा,' असे आदेश दिल्याची प्रत आयोगाला पाठविली. दि.२२.१२.२००९ च्या पत्रान्वये विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्रीमती मनीषा देसाई यांनी अहवाल

सादर केला 'त्या काळामधील झालेल्या कट्टांचा (ओट्याचा८ कामांची मोजमपे नेंदवी प्रापत करून सदर नोंदीचे अवोकन करता दगड कोठून आणला याची नोंद आढळून येत नाही. अवलोकनार्थ मोजमाप नोंदवहीची झेरॉक्स प्रत सोबत सादर केलेली आहे. ग्रामांचयतकडील सठा नोंवी आढळून येत नाही. श्री.एम.एस.शिंदे ग्रामसेवक यांची एक वेतनवाढ बंद केली आहे. तत्कालीन ग्रामसेवक श्री.के.आय.सय्यद हे सध्या निलंबित झालेले आहेत. स्त्री शौचालय (संडास) पाडून त्याचे दगड, माती कट्टास(ओट्यास) वापरले आहेत याबाबत संदिग्धता आहे.' असे त्यात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही न केल्याबद्दल गटविकास अधिकारी, मोहोळ, पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.प्रशांतसिंह मरोड याच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा, वर्तणूक नियम १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी करावी व आयोगाला दि.३०.१.२०१० पर्यंत अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक, छत्रपती ताराराणी विकास आघाडी,
शिरोळ तालुका, कलादालन, मु. पो.शिरोळ,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक, छत्रपती ताराराणी विकास आघाडी,
शिरोळ तालुका, कलादालन, मु. पो.शिरोळ,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर श्री. प्रशांत ढगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.५.२००८ व ७.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

निवडणूक प्रक्रिये संदर्भातील माहिती न्यायालयीन कामकाजासाठी ४८ तासात देण्याची मागणी आपण केली होती. परंतु ती ३० दिवसांनतर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी अपूर्ण व चुकीची दिली. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी अपील फेटाळणरे निकालपत्र एका ओळीत दिले. दि.२२.४.२००८ रोजीच्या अर्जानुसार दि. ११.६.२००८ रोजी माहिती दिली. त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली.

श्री. धर्माधिकारी यांनी दि.२२.४.२००८ रोजी अर्ज केला. त्यावर शुल्क भरण्याबाबत दि.२.५.२००८ रोजी कळविले. ८ रु.शुल्क भरुनही माहिती न मिळाल्याबाबत श्री. धर्माधिकारी यांनी स्मरणपत्र दिले. परंतु माहिती व्यक्तिश: नेणार असल्याचे त्यांनी नमूद केले असल्यामुळे माहिती पाठविली नव्हती. त्यांच्या स्मरणपत्रानंतर दि. ७.६.२००८ रोजी यु.पी.सी.ने माहिती पाठविली. माहिती अपुरी असल्याबाबत त्यांनी दि. ११.६.२००८ रोजी पाठविलेल्या पत्राला दि. १२.६.२००८ रोजी उत्तर दिले. न्यायालयीन कामकाजासाठी ४८ तासात माहिती द्यावी, अशी तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही, त्यामुळे त्यानुसार माहिती देण्याचा प्रश्न नव्हता. तसेच श्री. धर्माधिकारी हे स्वत: शिरोळ ग्रामपंचायत निवडणुकीत उमेदवार होते. नामनिर्देशन पत्र छाननीच्या दिवशीच्या कामकाजाची चित्रफीत वा ध्वनिफीत काढण्यात आली नाही, हे त्यांना माहीत असूनही त्याची मागणी त्यांनी केली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ यांनी लेखी व तोंडी नमूद केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्र पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
दि. ३१.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश बिरमल राऊत
द्वारा श्री. नितीन मोरे
नितीन मेडिकल अँड जनरल स्टोअर्स, मलिक
चौक, परंडा रोड, बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, उस्मानाबाद — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी, परंडा, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. सतीश बिरमल राऊत<br>द्वारा श्री. नितीन मोरे<br>नितीन मेडिकल अँड जनरल स्टोअर्स, मलिक<br>चौक, परंडा रोड, बार्शी, जि. सोलापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व शिक्षा अभियान,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद श्री. आर.डी. जोशी |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | गट शिक्षणाधिकारी, परंडा, बार्शी, जि. सोलापूर<br>श्री. ए.एम.जाधव<br>तत्कालीन गट शिक्षणाधिकारी, परंडा, बार्शी<br>श्री. जे.एस. शिवशरण |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.११.२००६ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आपल्याला माहिती ७६ दिवस विलंबाने व चुकीची दिली, आपण पाठविलेल्या शुल्काची मनी-ऑर्डर स्वीकारली नाही, त्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, परंडा, ता. बार्शी यांना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सतीश बिरमल राऊत यांनी केली.

तत्काळ माहिती देण्याचे आदेश संबंधित लिपिक श्री. म.स.मंडईवाला यांना दिले होते. त्यानंतर शुल्काबाबतचे पत्र श्री. बिरमल यांना विहित मुदतीत पाठविले. त्यांनी पाठविलेली मनी ऑर्डर संबंधित लिपिकाने अज्ञानामुळे स्वीकारले नाही. परंतु त्यामुळे माहिती निःशुल्क दिली, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परंडा, ता. बार्शी श्री. जे.एस.शिवशरण यांनी केले. संबंधित माहिती साक्षांकित करून दिलेली नव्हती, मात्र सर्व माहिती दिलेली होती. माहिती साक्षांकित करून देण्याचे आदेश आपण दिले व त्यानंतर श्री. बिरमल यांना पुन्हा माहिती दिली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद, श्री. आर.डी. जोशी यांनी केले.

एकाच विषयावरील खर्चाचे दोन वेगवेगळे आकडे दोन अर्जदारांना देण्यात आल्याचा मुद्दा श्री. बिरमल यांनी उपस्थित केला, तथापि संगणकीय मुद्रणातील ही चूक असून खर्चाच्या रकमेत तफावत नसल्याचे त्यांना स्पष्ट करण्यात आले, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), श्री. आर. डी. जोशी यांनी केले. श्री. बिरमल यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १,४,७ पाहता भाष्य, स्पष्टीकरण, अभिप्रायाची अपेक्षा केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी विचारणा करता येत नाही, याकडे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लक्ष वेधले. त्यांचे हे म्हणणे रास्त आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी श्री. शिवशरण यांनी अपीलकर्त्याची मनी ऑर्डर स्वीकारु नये, असे आपल्याला धमकावले होते, त्यामुळे आपण मनी ऑर्डर घेतली नाही. तसेच सांक्षाकन करून माहिती द्यावी लागेल, अशी विनंती आपण केली असताना त्यांनी ती नाकारली, असे लेखी निवेदन लिपिक श्री. मंडईवाला यांनी दि. १६.६.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. मात्र श्री. बिरमल यांच्या अर्जावर तत्काळ माहिती देण्याचा आदेश नमूद करून श्री. मंडईवाला

यांच्याकडे आपण अर्ज दिला होता. तथापि माहिती विहित मुदतीत न देणे, शुल्काची मनी ऑर्डर न स्वीकारणे, एकाच मुद्दयावरील दोन अर्जांत दिलेल्या माहितीत खर्चात तफावत दाखविणे आदी बाबी श्री. मंडईवाला यांनी केल्या. माहितीतील दोष व विलंब याला तेच जबाबदार आहेत, असे लेखी निवेदन श्री. शिवशरण यांनी आयोगाला दि. २०.११.२००८ च्या पत्रान्वये संबंधित अर्जाच्या शेरा असलेल्या प्रतीसह सादर केले. कार्यालयातंर्गत वादातून परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची ही बाब गंभीर आहे. याबद्दल श्री. शिवशरण व श्री. मंडईवाला या दोघांनाही समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप दत्तात्रय प्रभावळे
द्वाराशां. कृ.पंत वालावलकर
हायस्कूल, मुक्त सैनिक वसाहत, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
वि.स.खांडेकर प्रशाला, शाहूपुरी, व्यापार पेठ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दिलीप दत्तात्रय प्रभावळे
द्वारा शां. कृ.पंत वालावलकर हायस्कूल,
मुक्त सैनिक वसाहत, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी
श्री. सचिन जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
वि.स.खांडेकर प्रशाला, शाहूपुरी, व्यापार पेठ, कोल्हापूर श्रीमती पी. ए. घाटगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कॉपी प्रकरणात आपल्यावर झालेल्या कारवाई संदर्भातील माहिती देण्यात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वि. स. खांडेकर, प्रशाला, शाहूपुरी, कोल्हापूर हे टाळाटाळ व दिरंगाई करीत आहेत. तसेच चिफ कंडटक्टर व बिल्डिंग कंडक्टर यांच्या अहवालाची प्रत दिली जात नाही. नियमबाह्य कार्यवाही केल्यामुळे माहिती दिली जात नाही, कागदपत्र नसतील तर कारवाई कशाच्या आधारे केली? अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दिलीप दत्तात्रय प्रभावळे यांनी केली.

उपलब्ध माहिती देऊ केली असता श्री. प्रभावळे यांनी नाकारली. त्यामुळे ती रजिस्टर्ड टपालाने पाठविली. नियमबाह्य कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही. आपण आता सेवानिवृत असून संबंधित माहिती संस्थेकडे असून त्यांनी ती संस्थेकडून घेतली पाहिजे, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. जे.जी.पाटील यांनी केले. चिफ कंडक्टर यांचा अहवाल उपलब्ध नाही. त्यांना पत्र पाठवून विचारणा करीत आहोत, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वि.स.खांडेकर, प्रशाला, कोल्हापूर श्रीमती पी.ए.घाटगे यांनी केले. श्री. प्रभावळे यांनी आपल्याकडे प्रथम अपील केलेले नाही. थेट आयोगाकडेच अपील केले आहे. तसेच मुख्याध्यापकांकडे माहिती उपलब्ध नसल्यास त्यांनी संस्थेकडून घ्यावी, असे त्यांना कळविण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. सचिन जाधव, वरिष्ठ सहाय्यक यांनी नमूद केले.

दिलेल्या माहितीबाबतची तपासणी करुन उर्वरित माहिती देण्याची पूर्तता अपिलीय प्राधिकारी यांनी करुन घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी, आयोगाने स्मरण दिल्यानंतरही अद्याप सादर केला नसून दि. २५.१.२०१० पर्यंत सादर न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. ३१.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहआयुक्त (पुणे विभाग),
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहआयुक्त (पुणे विभाग),
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एस.एस.मोमीन

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, सातारा श्री.ए.एम.खडतरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

औषधाच्या दुकानाला दिलेला परवाना रद्द होणार की कायम राहणार अशी विचारणा आपण केली होती. परंतु ही विचारणा माहिती अथवा माहितीचा अधिकार या संज्ञेत येत नाही, असे कारण देऊन माहिती नाकारण्यात आली म्हणून माहिती देण्याची टाळाटाळ करणाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी श्री.दिलीप सिताराम देशपांडे यांनी केली.

प्रामुख्याने नगरपालिकेच्या कक्षेतील हा विषय आहे. नगरपालिकेने 'संजीवनी मेडिकल स्टोअर्स'ला ना-हरकत परवाना देऊन नंतर मागे घेतला आहे. त्या संदर्भात काय कारवाई करणार, हा संभाव्य कारवाईबाबतचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती 'च्या व्याख्येत येत नाही. त्यामुळे तसे श्री.देशपांडे यांना कळविण्यात आले. तसेच विषयांकित प्रकरणी अनुज्ञप्ती अधिकारी या नात्याने सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, सातारा यांच्याकडून अंतिम निर्णय होताच त्यांच्याकडूनच कळविण्यात येईल, असेही श्री.देशपांडे यांना तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, सातारा श्री.शि.र.बनकर यांनी कळविले, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, सातारा

श्री.ए.अेम.खडतरे व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एस.ए.मोमीन यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.११.१२.२००९**

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.सावळेराम जबाजी पाडेकर
मु.पो.संतवाडी (आळे),
ता.जुन्नर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता.जुन्नर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९७/२००९/ पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.३.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.४.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.९.५.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>१९९७-९८ ते २००३-०४ या कालावधीत वाणिज्य शाखेचा एकूण कार्यभार, शिक्षकांची नावे, संबंधित शिक्षकांनी शिकविलेले विषय, आठवड्याचा एकूण कार्यभार याबाबतची प्रत्येक वर्षनिहाय माहिती इ.अनुषंगिक एकूण ४ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सावळेराम जबाजी पाडेकर यांनी प्राप्त माहितीने समाधान न झाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दरम्यान काळात अपेक्षित माहिती प्राप्त झाल्याने आपले समाधान झाले असल्याने सदर अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.९.९.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविलेल्या पत्राची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आळे, ता.जुन्नर,जि.पुणे श्री.दत्तात्रय बाळशिराम दाते यांनी दिनांक ९.९.२००९ रोजीच्या पत्रासोबत आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : १८/ १२/२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे
तलाठी कॉलनी, इस्लामपूर, ता.वाळवा,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव,
श्री वारणा शिक्षण संस्था,
एतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,
ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०६.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** -श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे<br>तलाठी कॉलनी, इस्लामपूर, ता.वाळवा,<br>जि.सांगली<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव,<br>श्री वारणा शिक्षण संस्था,<br>एतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली श्री.बी.आर.थोरात<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,<br>शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,<br>ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.०५.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.०७.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन २००२-२००७ या काळातील हजेरी पत्रकाची प्रत आपण मागितली असता मार्च २००५ पर्यंतचे खरे हजेरीपत्रक दिले. पुढील हजेरी पत्रकावर आपल्या बनावट सह्या करुन त्याची प्रत दिली आहे. खरे हजेरीपत्रक लपवून ठेवले आहे, त्याची प्रत आपल्याकडे आहे. आपल्याला निलंबित करण्यात आले असून त्याविरुध्द आपण न्यायालयीन मार्गाचा अवलंब केला असल्यामुळे माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. रामचंद्र विष्णू साळुंखे यांनी केले. श्री.साळुंखे यांनी स्वत:कडील संबंधित हजेरीपत्रक आयोगापुढे सादर केले.

सन २००५ पर्यंतचे हजेरीपत्रक उपलब्ध होते. त्यानुसार प्रत दिली. त्यानंतरचे मूळ हजेरीपत्रक कार्यालयातून गहाळ झाल्यामुळे दुसरे हजेरीपत्रक संस्थेने तयार केले. त्यावर सह्या करण्यास श्री.साळुंखे यांनी नकार दिला. परंतु त्या त्या वेळी असलेली हजेरीची माहिती घेऊनच त्यानुसार नोंदी करण्यात आल्या. श्री.साळुंखे स्वत:च कागदपत्रे गहाळ करुन संस्थेवर आरोप करीत आहेत. संस्थेने दि.०१.०६.२००७ पासून त्यांना सेवेतून कमी केल्याने आकसापोटी विविध स्वरुपाची व अन्य कर्मचाऱ्यांचीही वैयक्तिक माहितीही मागवून संस्थेला व शाळेला त्रास देत आहेत. असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील यांनी केले.

श्री.साळुंखे यांनी अर्ज केला तेव्हा संस्थेचे अध्यक्ष हे अपिलीय प्राधिकारी होते. नंतरच्या काळात शिक्षणाधिकारी हे अपिलीय प्राधिकारी म्हणून जाहीर झाले. श्री.साळुंखे यांनीच हजेरीपत्रक गायब केले. संस्थेची लेटरहेडसुध्दा गहाळ करण्यात आली आहेत. श्री.साळुंखे यांना मदत करण्याचा प्रयत्न आपण केला. तथापि आता न्यायालायात दावा चालू आहे, असे प्रतिपादन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,श्री वारणा शिक्षण संस्था,एतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली श्री.बी.आर.थोरात यांनी केले. श्री.साळुंखे यांनी हेतुपुरस्सर कागदपत्र गहाळ केल्याचे तत्कालीन लिपिक श्री.आप्पासाहेब खराडे यांनी

प्रतिपादन केले. पगार पत्रकावरुन पुन्हा हजेरीपत्रक तयार केले. विनंतीनुसार इतरांनी सह्या केल्या. श्री.साळुंखे यांनी सह्या केल्या नाहीत. पगार पत्रकावरुन दुसरे हजेरीपत्रक तयार केले असल्यामुळे ज्या दिवसाचा पगार काढला तेथे हजर दाखविले व काढला नाही तेथे गैरहजर दाखविले, असे श्री.खराडे यांनी सांगितले.

कागदपत्रे बनावट केलेली आहेत की, नाही हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही. तसेच मूळ हजेरीपत्रक आपल्याकडे कसे आले, याचा खुलासा श्री.साळुंखे करु शकले नाहीत.

उभय बाजूंची निवेदन व सादर केलेली कागदपत्रे पहाता माहितीपेक्षा उभय बाजूंमधील वादापोटी आरोप - प्रत्यारोप केले जात असल्याचे दिसून येते. द्यावयाची राहीलेली माहिती पुरवून श्री.साळुंखे यांच्या अपिलाच्या संदर्भातील अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील यांनी १५ दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील यांनी दि.०२.०७.२००९ रोजी अहवाल सादर केला. श्री.साळुंखे यांनी केलेले विविध अर्ज व केलेली पूर्तता यांचा तपशील त्यात नमूद करण्यात आला आहे. तो लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २९/१२/२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. किरण अरूण भोसले — अपीलकर्ता
मु. पो.अकलूज, गणेशनगर, ता. माळशिरस,
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, ता. माळशिरस,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०३ + ५५३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. किरण अरूण भोसले
मु. पो.अकलूज, गणेशनगर, ता. माळशिरस,
जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — तहसीलदार, माळशिरस, ता. माळशिरस,
जि. सोलापूर श्री. वैभव विठ्ठलराव नावडकर

**जन माहिती अधिकारी** तथा — निवासी नायब तहसीलदार, ता. माळशिरस,
जि.सोलापूर श्री. श्रीकांत महादेव पोरे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४०३ / सोलापूर | ९.११.२००६ | २१.१२.२००६ | -- | ३.४.२००७ |
| ५५३ / सोलापूर | ३.४.२००७ | -- | ४.५.२००७ | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मौजे अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथील भूखंडाच्या संदर्भात आपण मागितलेले बिनशेती आदेश न देता खरेदीच्या व कुळाबाबतच्या कागदपत्रांची व फेरफाराची माहिती दिली. बिनशेती आदेश पाहता येतील परंतु त्याची नक्कल आवश्यक असल्यास उप विभागीय अधिकारी, पंढरपूर उपविभाग, पंढरपूर यांच्याकडून घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस यांनी आपल्याला कळविले, परंतु ते आदेश पाहावयास मिळाले नाहीत. चुकीची, अपुरी व दिशाभूल करणारीह माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर दंडात्मक व अन्य कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. किरण अरूण भोसले यांनी केली.

बिनशेती आदेश नसताना बिनशेती ७/१२ उतारे तयार करण्यात आले असावेत. तसेच खरेदी विक्रीचे फेरफार नोंदविले जात असावेत. सिटी सर्व्हेकडे संबंधित भूखंड वर्ग करणे आवश्यक असूनही शासनाची व बँकेची फसवणूक होत आहे. ७/१२ पत्रक बंद करणे आवश्यक आहे, असेही प्रतिपादन श्री. भोसले यांनी केले.

ज्या गावात सिटी सर्व्हे झालेले नाहीत तेथे ७/१२ उतारे चालू असतात. सिटी सर्व्हे पूर्ण झाले असल्यास ७/१२ च्या नोंदी बंद कराव्या, अशी तरतूद आहे.परंतु अकलूजबाबत सिटी सर्व्हे विभागाकडून अद्यापपर्यंत अभिलेख पूर्ण झालेले नाहीत, त्यामुळे उपलब्ध असलेली माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस श्री. श्रीकांत महादेव पोरे यांनी केले. संबंधित बिनशेती आदेश आढळ होत नसल्याचे गाव कामगार तलाठी यांनी लेखी दिले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस श्री. वैभव विठ्ठलराव नावडकर यांनी नमूद केले.

संबंधित कागदपत्रांच्या अनुषंगाने योग्य ती दखल घेऊन संपूर्ण माहिती व आवश्यक तेथे स्पष्टीकरण देणे जमीनविषयक अभिलेखाबाबतच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने गरजेचे आहे. अपीलकर्त्याकडून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून घेऊन या विषयीचा कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि त्यानुसार तहसीलदार श्री. वैभव विठ्ठलराव नावडकर यांनी अहवाल सादर केलेला नाही. आयोगाने स्मरण दिल्यानंतरही याबाबतची कार्यवाही त्यांनी पूर्ण केलेली नाही. योग्य माहिती देण्याची जबाबदारी आयोगाने त्यांच्यावर सोपविलेली असल्यामुळे पर्यायाने

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(५) मधील तरतुदीनुसार ते जन माहिती अधिकारी ठरतात व त्याबाबतची पूर्तता त्यांनी करणे आवश्यक होते. त्यानुसार पूर्तता न केल्याबद्दल ते शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या आदेशानुसार माहिती देण्याबाबतची कार्यवाही न केल्याबद्दल तहसीलदार, माळशिरस श्री. वैभव विठ्ठलराव नावडकर यांना रू.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम त्यांच्या जानेवारी २०१० व फेब्रुवारी २०१० च्या अनुक्रमे फेब्रुवारी २०१० व मार्च २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करून ती ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी करावी, व पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. २८.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ